## बालकांचे डोळ्याचे विकार व तिरळेपणा



### 1. Refractive error (चष्म्याचा नंबर)

१. डोळे बारीक करून बघणे किंवा जवळ जाऊ न बघणे.
२. डोळे चोळणे/डोळयातून पाणी येणे
३. डोके दुखणे/डोळयांवर ताण येणे
४. अभ्यासात चुका होणे
५. पापण्यांवर वारंवार फोड येणे.

### 2. Squint (तिरळेपणा) तिरळेपणामुळे होणारे दुष्परिणाम

१. दृष्टी मंद होणे.
२. द्विनेत्री व त्रिमितीय दृष्टी (3D Vision) नष्ट होणे.
३. डबल दिसणे
४. मान/डोके एका बाजूला वळणे.
५ सौंदर्य व आत्मविश्वास गमावणे.



### 3. White Reflex (डोळयात पांढरा प्रतिक्षेप)

**कारणे**

१. मोतीबिंदू, २. कर्करोग, ३. आर.ओ.पी., ४. संसर्ग

आपल्या बालकांमध्ये वरील किंवा इतर कोणतेही लक्षणे दिसताच, लवकरात लवकर विशेषज्ञांचा सल्ला घ्या. कोणतेही लक्षण नसले, तरीही, वयाच्या तिसऱ्या वर्षी प्रत्येक बालकाच्या डोळयाची तपासणी कोणतेही लक्षण नसले, तरीही, (routine check up) करुन घ्या. त्यामुळे आधी लक्षात न आलेल्या काही विकारांचे निदान होते व योग्य तो इलाज , योग्य वेळी शक्य होतो.

### तिरळेपणा-गैरसमज आणि वास्तव

तिरळेपणा हा इसोट्रीपिया व एक्सोट्रीपिया अशा दोन मुख्य प्रकारांचा असतो. अनुवंशिक, न्युरॉलॉजिकल चष्म्याचा नंबर, डोक्याला किंवा डोळयांना मार लागणे अशा कारणांमुळे तिरळेपणा येउु शकतो. तिरळेपणा असलेल्या प्रत्येक व्यक्तीला विशेषज्ञांकडून तपाशीलवार तपासणी व इलाजाची गरज असते.

**विशेषतः लहान मुलांच्या तिरळेपणा विषयी असणारे गैरसमज दूर करणारे काही मुदद्.**

**गैरसमज १. लहान मुलांचा तिरळेपणा आपोआप जातो.**

लहान मुलांचा तिरळेपणा आपोआप जात नाही, या गैरसमजामुळे मुलांच्या इलाजाला उशीर होतो व त्यामुळे दृष्टीवर कायमस्वरूपी दुष्परिणाम होतो. तिरळेपणा लक्षात येताच त्याची तपासणी व इलाज झाला पाहिजे.

**गैरसमज २: तिरळेपणा ही केवळ सौंदर्य समस्या असते.**

**वास्तव :** तिरळेपणामुळे चेहरा तर विद्रुप दिसतोच, पण त्याहीपेक्षा महत्वाचे म्हणजे डोळयांची





दृष्टी, Vision व त्रिमितीय दृष्टी गमावली जाते. इलाज लवकरात लवकर झाल्याने विद्रुपता तर जातेच, परंतु दृष्टी व त्रिमितीय दृष्टी चांगली राहते. 3 D Vision नसल्याने दैनंदिन आयुष्यात खोलीचा अंदाज येणे, वाहन चालवणे इ. तसेच काही व्यवसायात (मिलिटरी, पायलट, खेळाडू) बाधा येते. 3D Vision नसल्याने दृष्टीक्षेत्र कमी होते व अपघाताची शक्यता वाढते. बरेचदा तिरळेपणा हे मोतीबिंदू, कर्करोग, संसर्ग अशासारख्या डोळयांच्या गंभीर आजाराचे ही लक्षण असू शकते.

**गैरसमज ३ : तिरळेपणाचा इलाज होऊ शकत नाही.**

**वास्तव :** तिरळेपणाचा इलाज कुठल्याही वयाला होऊ शकतो. चष्मा, डोळयांचे व्यायाम, शस्त्रक्रीयेने तिरळेपणा बरा होतो. हा इलाज लहान मुलांमध्ये अनेक वर्षे करावा लागतो व त्यासाठी पालकांचे सहकार्य गरजेचे असते. इलाज जितका लवकर सुरू होईल, तितका जास्त परिणामकारक असतो.

**गैरसमज ४ : तिरळेपणाच्या शस्त्रक्रियेने डोळयांना इजा होते.**

**वास्तव :** विशेषज्ञ ही शस्त्रक्रिया अतिशय जपून व सुरक्षितरित्या करतात. यात डोळा उघडला जात नाही. डोळयाच्या पांढऱ्या भागात असलेले स्नायू घटट् अथवा सैल केले जातात. दृष्टीला हानी होत नाही अथवा कोणताही डाग राहत नाही.

**गैरसमज ५: शस्त्रक्रियेनंतर तिरळेपणा परत येतो.**

**वास्तव :** निदान व शस्त्रक्रियेचे तंत्र अचूक असेल तर तिरळेपणा परत येण्याची शक्यता खूपच कमी असते. तिरळेपणा परत येईल, या भीतीने शस्त्रक्रिया न करून घेणे, हे दृष्टीसाठी जास्त हानिकारक आहे. शस्त्रक्रियेनंतर काही वर्षोनी जरी तिरळेपणा आला तरी त्यासाठी देखील काही उपाय असतात.

**गैरसमज ६ : माझे बाळ शस्त्रक्रियेसाठी अजून लहान आहे.**

**वास्तव :** तिरळेपणाचा इलाज जास्तीत जास्त परिणामकारक होण्याकरिता शस्त्रक्रिया ही अगदी लहान वयात झाली पाहिजे. विशेष तज्ज्ञांनी सांगीतले असल्यास शस्त्रक्रिया पुढे ढकलू नये. त्यानेच आपल्या बाळाचे नुकसान होते.


**डॉ. तन्मयी धामणकर**

D.O, DNB,

Fellowship in Paediatric Opthamology & Strabismus